स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे. ४११ ००१**
Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९

क्र.पदभ/११२१/प्र.क्र.१०/मवि-१ / 6108 दिनांक २४.०६.२०२२ 24 JUN 2022

**अत्यंत महत्वाचे**
**पदभरती**

प्रति,
१. सर्व विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे

**विषय :महाराष्ट्र शैक्षणिक संस्था(अध्यापक संवर्गातील आरक्षण ) अधिनियम, २०२१ च्या अंमलबजावणीबाबत स्पष्टीकरण**

**संदर्भ :** १.शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.९४/१९/विशि-१ दिनांक ११ एप्रिल, २०२२
२.शासन पत्र क्र. संकीर्ण-२००५/प्र.क्र. ९८/ विशि-१ दि.२४.०६.२०२२

शासन स्तरावरून आपणास पाठविण्यात आलेले संदर्भ क्र.२ चे पत्र अवलोकनी घ्यावे.(प्रत संलग्न)

महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ च्या अंमलबजावणीबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व सामान्य प्रशासन विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने, विधी व न्याय विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार शासनस्तरावरून स्पष्टीकरण कळविण्यात आलेले आहे.

संदर्भांकीत पत्रातील खुलासा/ स्पष्टीकरणात्मक सूचनांप्रमाणे विषयांकीत प्रकरणी आपल्या स्तरावरून कार्यवाही करण्यात यावी. तसेच सदर सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत आपल्या कार्यकक्षेतील सर्व संलग्नित महाविद्यालये/ संस्थांना आपल्या स्तरावरून सूचीत करण्यात यावे.

सोबत- वरीलप्रमाणे

**( डॉ.प्रकाश बच्छाव )**
शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत माहितीस्तव सविनय सादर.
मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

ई-मेल.vishi१-hted@mah.gov.in, popat.galgate@gov.in दूरध्वनी क्र.०२२ २२७९३१७४

क्रमांक:- संकीर्ण-२२०५/प्र.क्र.९८/विशि-१ दिनांक:-२४/०६/ २०२२

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त.
२. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. संचालक, कला शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. सर्व कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
६. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च/तंत्र शिक्षण.

<u>विषय</u> :- महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ च्या अंमलबजावणीबाबत स्पष्टीकरण.

<u>संदर्भ</u> :- १) शासन अधिसूचना क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र. ९४/१९/विशि-१, दि. ०७/०४/२०२२.
२) शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र. ९४/१९/विशि-१, दि. ११/०४/२०२२.
३) कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे दि.०५/०५/२०२२ रोजीचे पत्र.

महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी संदर्भाधिन क्र. ३ येथील दि.०५.०५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये तसेच सामान्य प्रशासन विभागाने देखील काही मुद्यांबाबत अभिप्राय/मार्गदर्शन करण्याची विनंती केलेली आहे. औरंगाबाद विद्यापीठाने व सामान्य प्रशासन विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने विधि व न्याय विभागाने दिलेल्या अभिप्रायास अनुसरुन प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

| क्र. | मुद्दा | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १ | ज्या संस्थेचे एकापेक्षा अधिक महाविद्यालये आहेत अशा संस्थेस प्राचार्य पदाचे ना-हरकत पत्र देण्यात आले व जाहिरात प्रसिध्द झाली आहे, परंतू मुलाखती अद्याप झालेल्या नाहीत, अशा स्थितीत प्राचार्य पदांच्या दिलेल्या जाहिराती रद्द करण्यात येऊन प्राचार्य पद समान वेतनश्रेणीतील | महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ अंमलात येण्यापूर्वी सुरू झालेल्या व अद्याप पर्यंत पूर्ण न झालेल्या प्राचार्य पदाचे भरती प्रक्रियेस सदर अधिनियमातील तरतुदी लागू होणार नाहीत. |

| | | |
|---|---|---|
| | एकत्रित करून प्राचार्य पदास नव्याने आरक्षण लागू करण्यात यावे किंवा कसे ? | |
| २ | शिक्षक संवर्गातील समान वेतनश्रेणीतील ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक पदे सहायक प्राध्यापक म्हणून बिंदुनामावलीमध्ये एकत्रित दर्शविण्यात यावीत किंवा स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावी. | महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ अन्वये समान वेतनश्रेणीतील शिक्षकीय पदे एकत्रित करून त्यानुसार संवर्गनिहाय आरक्षण लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. सदरची पदे शिक्षक संवर्गातील असल्याने सदर पदांची बिंदुनामावली वेतनश्रेणी विचारात घेऊन सहायक प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक /प्राध्यापक या संवर्गाच्या बिंदुनामावलीत एकत्रित दर्शविणे आवश्यक आहे. |
| ३ | विना अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकीय पदांचे आरक्षण कोणत्या प्रकारे राहील याबाबत देखील संदिग्धता/अस्पष्टता आहे. | महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ मधील तरतुदीनुसार सदर संवर्गनिहाय आरक्षण ज्या संस्थांना राज्य शासनाकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अनुदान मिळते अशा शैक्षणिक संस्थांना लागू असल्याने विना अनुदानित/कायम विनाअनुदानित संस्थांना सदर आरक्षण धोरणातील तरतुदी लागू होणार नाहीत. |
| ४ | पदभरतीच्या अनुषंगाने बिंदुनामावली तपासणी व आरक्षणनिश्चिती तसेच जाहिरात देणे या बाबींची पूर्तता होत असली तरी अद्याप प्रत्यक्ष पदभरती झाली नाही, अशा प्रकरणी भरतीप्रक्रिया पूर्ण करावी की, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी. | महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ अंमलात येण्यापूर्वी सुरू झालेल्या व अद्याप पर्यंत पूर्ण न झालेल्या भरती प्रक्रियेस सदर अधिनियमातील तरतुदी लागू होणार नाहीत. तथापि प्रचलित कार्यपध्दतीप्रमाणे NOC ची मुदत संपल्यास मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करावा. |

(धीरज अभंग)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग (का.१६-ब), मंत्रालय, मुंबई – ३२.

२) निवडनस्ती (विशि-१)